PEER- REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

ISSN 2278-5655

Impact Factor :0.948

Bi-Monthly

VOL - II | ISSUES - V | [2013-14]



Chief-Editor:

Ubale Amol Baban

[ **Editorial/Head Office**: 108, Gokuldham Society, Dr.Ambedkar chowk, Near TV Towar,Badlapur, MS

# "माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरिकत्व वर्तन यातील सहसंबंधाचा अभ्यास"

**मार्गदर्शक**
**डॉ. सुनिता मगरे**
**सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग,**
**मुंबई विद्यापीठ**
**विद्यापीठ**

**संशोधक**
**मगर ज्ञानेश्वर गोविंद**
**पीएच.डी विद्यार्थी,**
**मुंबई**

## प्रस्तावना

शिक्षणप्रक्रिया ही राष्ट्रीय उत्पन्न व राष्ट्रीय विकांसाशी निगडीत आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा दर व राष्ट्राच्या प्रगतीचा आलेख उंचावण्यासाठी शिक्षणप्रक्रिया मोलाची भूमिका निभावताना दिसत आहे. परंतु शिक्षणप्रक्रिया हे साध्य करण्यासाठी कटीबध्द असणाऱ्या शिक्षकांवर अवलंबून असते. शिक्षकांनी व्यवसायाशी बांधील राहून प्रामाणिकपणे जर काम केले नाही तर राष्ट्रीय विकासामध्ये अडथळा येऊ शकतो. शिक्षकांनी उत्कृष्टपणे व परिणामकतेने काम केले तर आपण आपल्या राष्ट्राच्या भवितव्याविषयी आत्मविश्वासाने बोलू शकतो. म्हणून शिक्षणप्रक्रियेत शिक्षकांच्या महत्वाला त्यांच्या गरजांना अधिक महत्व देणे आवश्यक आहे.

The Education Commission (1964-66) observed "of all different factors which influence the quality of education and its contribution to material development, the quality of education competence and character of teacher are undoubtedly, the most significant"

शिक्षकांची व्यवसायप्रतीची ओळख ही मुख्यत: त्यांच्या व्यवसायातील समाधानावरुन समजते की जे त्यांना या व्यवसायातून मिळते. अनेक संशोधनावरुन असे लक्षात येते की, जेव्हा व्यक्ती त्याच्या कामामध्ये समाधानी असते तेव्हा फक्त त्यालाच फायदा होत नाही तर तो ज्या संस्थेत, ज्या ठिकाणी काम करतो त्यांना सुध्दा त्याचा फायदा होत असतो. व्यवसाय समाधान हे त्या व्यक्तीचे कार्यमान उंचावते. त्याचबरोबर त्याच्या व्यक्तिगत कामाच्या स्वरुपाची परिणामकारकता देखील वाढविते म्हणून व्यवसाय समाधान ही संकल्पना प्रत्येक क्षेत्राशी निगडीत असून तिचा प्रत्येक ठिकाणी विचार केला गेला पाहिजे, हा एकमेव उद्देश्य !

**व्यवसाय समाधानाची संकल्पना :**

व्यवसाय समाधान म्हणजे व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिच्या त्याच्या व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, त्याच्यामधील विविध अभिवृत्तींचे फलितार्थ होय.

व्यवसाय समाधानाचा संकुचित अर्थ घेतला तर, या अभिवृत्ती व्यवसायाशी आणि त्याच्याशी निगडीत काही घटकांशी संबधित आहे की ज्यामध्ये विशेषत: पर्यवेक्षण, कर्मचाऱ्याची स्थिरता, कामाच्या ठिकाणची स्थिती, कामाच्या संधी, बढती, पात्रतेनुसार काम, कामाचे मूल्यांकन, व्यवसायाच्या ठिकाणातील सामाजिक संबंध तणवाचे व्यवस्थापन, इतर कर्मचाऱ्याकडून मिळणारी वागणूक आणि इतरांशी समायोजन.

जर व्यापक किंवा सर्वंकष दृष्टीकोनातून विचार केला तर त्यामध्ये प्रामुख्याने कर्मचाऱ्याचे वय, आरोग्य, सहनशीलताश इच्छा आणि महत्वाकांक्षा याहीपुढे त्याचे कौटुंबिक सबंध, सामाजिक प्रतिष्ठा, संस्थेतील स्थान, राजकिय किंवा सामाजिक मत्त्व या सर्व घटकांचा संबंध व्यवसाय समाधनाशी आहे.

थोडक्यात व्यवसाय समाधानामध्ये पुढील तीन क्षेत्रातील घटकांचा प्रामुख्याने समावेश होतो.

१. व्यवसायातील विशिष्ट घटक
२. व्यक्तिगत गुणवैशिष्टये
३. व्यवसायाबाहेरील समुहातील संबंध

व्यवसाय समाधानाचे महत्त्व :

१. व्यवसाय समाधान असणारी व्यक्ती त्या वयवसायामध्ये अधिकाधिक प्रगती करते.
२. व्यक्तिंची कार्यक्षमता वाढते
३. व्यक्तिच्या कामाची परिणमकारकता वाढते
४. काम करताना थकवा जाणवत नाही.
५. समायोजन क्षमता सुधारते.
६. व्यावसायिक वृद्धीसाठी प्रेरण मिळते.
७. सस्थेच्या विकासासाठी हातभार लावता येतो.
८. व्यावसायिक तणावाचे प्रमाण कमी होते.

व्यवसाय समाधानामुळे खालील क्षेत्रांमध्ये यशस्वीपूर्ण समायोजन साधता येते;

१. स्वत:शी समायोजन

२. समाजाशी समायोजन

३. कामाशी समायोजन

व्यवसाय समाधानावर परिणाम करणारे घटक

## संबंधित साहित्याचे सिंहावलोकन

### भारतातील संशोधने

रामकृष्ण (१९८०) यांनी महाविद्यालयीन शिक्षकांच्या अध्यापन आणि व्यवसाय समाधानाच्या वृत्तीचा अभ्यास केला.

शेखर व रंगनाथन (१९८८) यांनी कोईमतूर मधील पदवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास केला.

रेड्डी बालकृष्ण (१९८९) यांनी प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास केला.

जयशंकर (१९८९) यांनी पदवीस्तरावरील महाविद्यालयीन शिक्षकांची मुल्ये आणि व्यवसाय समाधानासंबंधी त्यांच्या अध्यापन परिणामकारकतेचा अभ्यास केला.

सुब्रमण्यम (१९९०) यांनी विद्यापीठातील व्यवसाय समाधानासंबंधी काही चलांचा शोध याचा अभ्यास करणे.

सक्सेना निर्मल (१९९०) यांनी अध्यापन व्यवसायातील व्यवसाय समाधानाचा काही सहसंबंधाचा अभ्यास केला.

सक्सेना पी. एल (१९९०) यांनी मध्यप्रदेशातील उच्च माध्यमिक शाळेच्या व्याख्यात्याच्या कार्यातील व्यवसाय समाधानाचा परिणाम अभ्यासला.

रे एस (१९९०) यांनी विद्यार्थ्यांबाबत शिक्षकांची अभिवृत्ती आणि त्यांचा व्यवसाय समाधान याचा अभ्यास केला.

नाईक (१९९०) यांनी तात्पुरत्या स्वरुपाच्या नेमणूका केलेल्या शिक्षकांच्या व्यवसायात समाधानासंबंधीच्या घटकांचा अभ्यास केला.

अग्रवाल (१९९१) यांनी काही बदलत्या चलांचा आणि मुल्य यांचा शिक्षकांच्या व्यवसाय समाधानासंबंधीचा अभ्यास केला.

बासी (१९९१) यांनी भाषा शिक्षकांची अध्यापन कार्यक्षमता आणि व्यवसाय समाधान स्वत:चे निश्चित स्थान, व्यवसायातील तळमळ यांच्यातील संबंधाचा अभ्यास केला.

राममोहन बाबू (१९९२) यांनी निवासी आणि अनिवासी शिक्षकांच्या अध्यापनातील व्यवसाय समाधान, अभिवृत्ती, व्यवसाय सहभाग, अध्यापन कार्यक्षमता आणि संघटनात्मक वातावरणाचा स्वीकार याचा अभ्यास केला.

रावत (१९९९) यांनी माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे व्यवसाय समाधान आणि मुल्य चौकट, व्यवसायातील वास्तवता आणि अपेक्षा यांच्या लिंग भेद संबंधीचा अभ्यास केला.

रॉय (१९९१) यांनी शिक्षकांच्या अध्यापन अभिवृत्ती आणि त्यांचा व्यवसाय समाधानकारकता यांच्यातील तुलनात्मक अभ्यास केला.

नॉनग्राम (१९९२) यांनी शिलॉंगमधील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक समाधानाचा आणि मुख्याध्यापकांचा नेतृत्व गुणांचा अभ्यास केला.

घाटोल (१९९९) यांनी शिक्षक कृती आणि शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा त्यांच्या परिपक्वतेचा, निश्चित स्थान आणि संघटनात्मक गुंतागुंतीचा संबंधाचा अभ्यास केला.

आर नीलकंदन आणि के राजेंद्र हयांनी सार्वजनिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास केला.

भट (१९९९) हयांनी एल आय सी कर्मचाऱ्यांच्या सामाजीक वैयक्तिक चले आणि व्यवसाय समाधान याचा अभ्यास केला.

गंधर्व आणि जोशी (१९९९) हयांनी औदयोगिक कर्मचाऱ्यांचा व्यवसाय, कार्यातील सहभाग, व्यवसायातील सहभाग, आणि व्यवसाय समाधान यांचा अभ्यास केला.

**परदेशातील संशोधने**

या संदर्भातील बराच अभ्यास शिक्षणोत्तर क्षेत्रात राबविला आहे. पण त्यांच्या निष्कर्षाशी शिक्षक कर्मचाऱ्यांच्या घनिष्ठ संबंध आहे. हया विभागात काही साहित्य अनुभवजन्य आहे तर साहित्याचे स्वरुप संकल्पनांवर भर देणारे आहे.

हेरॉन (१९५२, १९५४, १९५५) शिक्षकांच्या व्यवसाय समाधानात व्यवसाय कार्यासंबंधीचे महत्व नोंदविले आहे.

शॉफर (१९५३) यांनी व्यक्तिगत समाधान आणि असमाधानासाठी मदत करणाऱ्या चलांना अधिक महत्व दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार मानसशास्त्रीय घटक किंवा यांत्रीक घटक हे व्यक्तीस समाधान किंवा असमाधानावर कार्य करत असतात.

ब्रे फील्ड आणि क्रॉकेट (१९५५) कार्य सादरीकरणाचा आणि व्यवसाय समाधान यांच्यातील संबंध कमकुवत नसल्याने कथन केले आहे.

लावलेर आणि हॉल (१९७०) कार्य सादरीकरण आणि व्यवसाय समाधान यांचा अर्थाअर्थी काही संबंध नाही. परंतु कार्यमग्नतेत त्यांचा संबंध आहे.

हर्जबेरी (१९५७) यांनी व्यवसाय समाधान आणि निश्चित कार्य वर्तन यात ही संबंध दिसुन येतो, व्यवसाय समाधानात वाढ किंवा कमतरता करण्याकरिता परिसर महत्वाची भूमिका करते. तसेच व्यवसाय समाधानासाठी प्रेरकाची गरज असते.

पॉर्टर आणि लॉलर (१९६८) कार्य सादरीकरण आणि व्यवसाय समाधान यांच्यात अंगभूत गोष्टींचा जास्तीचा संबंध आहे.

लॅडी (१९७८) यांनी केलेल्या अभ्यासातून असे सुचित होते की, व्यक्तिगत समाधान हे एखाद्या बक्षिसावर अवलंबुन असून त्यातुन पध्दतशीर अप्रसन्न मिळाल्यास त्यांना विचारलेल्या व्यावसायिक समाधानकारकतेच्या प्रश्नांवर मिळालेली उत्तरे वेगवेगळी असतात.

इन्स्टीटयुट ऑफ सायन्सेस, यु.एस शिक्षण विभाग (१९९७) यांनी अमेरिकन शिक्षकांमधील व्यवसाय समाधान, नोकरीच्या शिक्षणातील वातावरणाचा परिणाम, पार्श्वभुमी आणि शिक्षकांचा मोबदला यावर संशोधन केले.

व्हेल्वस्टन (१९९८) यांनी शैक्षणिक अधिकाऱ्यांमधील कामातील समाधान आणि कामाशी संबंधीत तणाव यातील अंतर संबंधाचा अभ्यास केला.

इगबुले (२००३) यांनी नायजेरिया विद्यापीठातील शैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या व्यवसाय समाधानाशी निगडीत घटक याविषयावर संशोधन केले.

हरेरा (२००३) यांनी आय ए ए संस्थेतील एन ओ ए ए विभागातील शारिरीक प्रशिक्षकांतील व्यवसाय समाधान यावर संशोधन केले.

कॅरालिन आणि विल्यम (२००६) यांनी शिक्षक स्वायतत्ता आणि तणाव, कार्यसमाधान, सशक्तपणा, आणि व्यवसायीकीकरणाच्या सहबंधाचा अभ्यास केला.

## संशोधन अभ्यासाची गरज

भारताच्या संदर्भात संबंधित साहित्याच्या सिंहावलोकनातून सूचीत होते की, शिक्षकांच्या व्यवसाय समाधान संबंधित अभ्यासात विद्यार्थ्यी आणि शिक्षकांचा अध्यापनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, संघटनात्मक संघर्ष आणि नेतृत्व शैली, व्यवसाय सहभाग, व्यवसाय प्रेरणा, व्यवसायिक तणाव, भावनिक बुध्दीमत्ता, सामाजिक आणि जनसंख्या घटक, मानसशास्त्रीय.सामाजिक परिपक्वता, मुल्ये, अध्यापन परिणामकारकता, निश्चित स्थान, बर्न आउट आणि सामजिक आर्थिक परिस्थीती, याबाबत महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक, प्राथमिक आणि माध्यमिक शालेय, तात्पुरत्या स्वरुपाचे विद्यापीठीय शिक्षक तसेच निवासी व अनिवासी शालेय शिक्षकांवरती संशोधने झाली आहेत.

तथापि, शिक्षक व्यवसाय समाधानाशी संबंधित संघटनात्मक नागरिकत्व वर्तन याबाबत फार थोडी संशोधने दिसुन आली. म्हणुन संशोधक सदर संशोधन करीत आहे.

## संशोधन समस्या विधान

**“माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरिकत्व वर्तन यातील सहसंबंधाचा अभ्यास”**

## संशोधनाची चले

संबंधित संशोधनासाठी खालील चलांचा समावेश करता येईल.

१. व्यवसाय समाधान (श्रवइ ैजपेबिजपवद)

२. संघटनात्मक नागरिकत्वाचे वर्तन(व्तहंदप्रंजपवदंस ब्पजप्रमदेीपच ठमींअपवनत)

## कार्यकारी व्याख्या

संशोधनाच्या उपयोगात आणलेल्या संकल्पनांच्या कार्यकारी व्याख्या खालीलप्रमाणे.

### १. व्यवसाय समाधान

शिक्षकाचे व्यवसाय समाधान म्हणजे, त्यांच्या व्यवसायासंबंधी काही घटक उदा. वेतन, सुरक्षितता, दर्जा, आंतरव्यक्ति संबंध, पर्यवेक्षण, धोरण आणि प्रशासन कामाची स्थिती, कार्याचा प्रकार, कार्यातील अभिरुची, मान्यता, संपादन, जास्त कामाची जबाबदारी, उच्च दर्जाच्या कामासाठी वृध्दी आणि विकासाची संधी संदर्भात शिक्षकाची अपेक्षा परिपूर्ण होण्याची पातळी होय.

### २. संघटनात्मक नागरिकत्व वर्तन

संस्थेकडुन कोणत्याही प्रकारची अपेक्षा न बाळगता स्वेच्छेने शिक्षकांनी त्यांच्या दैनंदिन कार्या व्यतिरिक्त निभावलेली अतिरिक्त भुमिका त्यामध्ये नियमितता, इतरांना सहकार्य, नवपोक्रमशिलता म्हणजे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन होय.

## संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधन अभ्यासाची निश्‍चित उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाची खालील गटांमध्ये तुलना करणे.

१) पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका

२) अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक

३) ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी भागातील शिक्षक

४) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक

५) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक

२. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या संघटनात्मक नागरिकत्वाच्या वर्तनाची खालील गटांमध्ये तुलना करणे.

१) पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका

२) अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक

३) ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी भागातील शिक्षक

४) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक

५) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक

३. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा त्यांच्या संघटनात्मक नागरिकत्व वर्तनाशी सहसंबंधाचा खालील गटांमध्ये तुलना करणे.

१) पुरुष शिक्षक २) स्त्री शिक्षिका

३) अनुदानित शाळेतील शिक्षक ४) विना अनुदानित शाळेतील शिक्षक

५) ग्रामीण शाळेतील शिक्षक ६) शहरी भागातील शिक्षक

७) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक ८) तात्पुरते नियुक्त शिक्षक

९) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक १०) पदवीधर शिक्षक

११) एकुण शिक्षक

**संशोधनाच्या परिकल्पना**

संशोधनाच्या शून्य परिकल्पना खालील प्रमाणे आहेत.

१. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानात खालील गटामध्ये लक्षणीय फरक नाही.

१) पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका

२) अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक

३) ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी शाळेतील शिक्षक

४) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक

५) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक

२. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या संघटनात्मक नागरिकत्व वर्तनात खालील गटामध्ये लक्षणीय फरक नाही.

१) पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका

२) अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक

३) ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी शाळेतील शिक्षक

४) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक

५) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक

३. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरिकत्व वर्तन यात खालील गटामध्ये लक्षणीय सहसंबंध नाही.

१) पुरुष शिक्षक २) स्त्री शिक्षिका

३) अनुदानित शाळेतील शिक्षक ४) विना अनुदानित शाळेतील शिक्षक

५) ग्रामीण शाळेतील शिक्षक ६) शहरी भागातील शिक्षक

७) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक ८) तात्पुरते नियुक्त शिक्षक

९) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक १०) पदवीधर शिक्षक

११) एकुण शिक्षक

## संशोधन अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा

प्रस्तुत संशोधन फक्त माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा समावेश केला आहे. प्राथमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि वरीष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा समावेश केला नाही. सदर संशोधनात ठाणे जिल्हयातील शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षकांचा समावेश केला आहे. त्यात मुंबई आणि महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही भागाचा समावेश केलेला नाही. ठाणे जिल्हयातील निवडक मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळा आहेत. केंद्रीय परीक्षा मंडळाचा किंवा आंतरराष्ट्रीय शालेय परीक्षा मंडळाशी संबंधित नसलेल्या शाळा आहेत. तसेच संशोधनात मराठी माध्यमांच्या शाळेतील शिकविणारे शिक्षक आहेत, त्यामध्ये हिंदी, उर्दु, गुजराथी आणि अन्य भाषिक माध्यमांचा संबंध नाही.

संशोधनात माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरिकत्व वर्तन सहसंबंध अभ्यासला आहे. सदर संशोधन हे संख्यात्मक श्रेणीपध्दतीचे असून त्यातुन गुणात्मक भाग वगळला आहे.क्रिसा आणि मारगान (१९७०) आणि ग्रे व आयसन (२००३) यांनी विकसित केलेल्या निष्कर्षावर आधारित सदर नमुना आकार ठरविण्यात आला आहे.

**संशोधनाची कार्यपध्दती**

प्रस्तुत संशोधनात सहसंबंध, कारणमीमांसा व तुलनात्मक आणि वर्णनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनातील विविध चलांशी पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका, अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक, ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी शाळेतील शिक्षक तसेच कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक, पदव्युत्तर पदवीधर शिक्षक, पदवीधर शिक्षकांची तुलना केली जाईल, म्हणून कारणमीमांसा तुलनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

संशोधन अभ्यासात माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा त्यांची व संघटनात्मक नागरिकत्व वर्तन यांच्यातील सहसंबंध अभ्यासला असून त्याकरिता सहसंबंधात्मक अभ्यास पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचे न्यादर्श**

प्रस्तुत संशोधनात ठाणे जिल्हयातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील जवळपास ३४५ शिक्षकांचा समावेश करण्यात आला आहे.

नमुना निवडीसाठी त्रीस्तरीय नमुना तंत्राचा वापर करण्यात आला, पहिल्या स्तरात ठाणे जिल्हयातील न्यादर्श नमुना निवड तंत्रातील लॉटरी पध्दतीने चार तालुके निवडले गेले. दुसऱ्या स्तरात या प्रत्येक तालुक्यातील अनुदानित व्यवस्थापन प्रकारातील खाजगी अनुदानित व खाजगी विना अनुदानित शाळांची निवड करण्यात आली आणि तिसऱ्या स्तरात संशोधन संबंधित शाळेतील शिक्षकांचा न्यादर्श नमूना म्हणून निवडण्यात आला.

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनात खालील साधनांचा वापर करण्यात आला.

१) **घाटोल (१९९७)** यांची व्यवसाय समाधान मापन श्रेणी.

२) **डिसुझा (२००४)** यांची संघटनात्मक नागरिकत्व वर्तन मापन श्रेणी.

**माहिती विश्लेषणाची तंत्रे**

प्रस्तुत संशोधनातील माहितीचे विश्लेषण करण्यासाठी खालील सांख्यिकी तंत्राचा वापर केला आहे.

अ) केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे. ब) विचलनशीलतेची परिमाणे क) 'टी' परिक्षिका

ड) सहसंबंध गुणक इ)झेड परिक्षिका

## संशोधनाचे महत्व

सदर संशोधन अभ्यासाच्या निष्कर्षातुन असे अपेक्षित आहे की, व्यवसाय समाधानाकरीता जे मानसशास्त्रीय घटक परिणाम करतात, यासंबंधीची माहिती शाळेचे मुख्याध्यापक संस्थाचालकांना प्रकर्षाने मिळेल.

सदर माहितीला अनुसरुन त्यांना खालील समर्थन करता येईल.

१. स्वत:च्या वर्तनात बदल घडवून आणण्यासाठी आणि शिक्षकांना हाताळण्यासाठी.

२. शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाच्या वाढीसाठी विविध कार्यक्रम आणि धोरण विकसित करणे व ते लागु करणे.

सदर संशोधनानंतर शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकीमध्ये वाढ करता येईल. तसेच संघटनात्मक स्वास्थ्य निकोप राखण्यासाठी कोणते प्रयत्न करणे गरजेचे आहे याची माहिती मिळेल.

एकंदरित संशोधन अभ्यासामध्ये निष्कर्षावरुन शिक्षकांच्या कार्यात विकासाची संभावना अपेक्षित आहे.

## संशोधनाचे निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत,

१. माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानात खालील गटामध्ये लक्षणीय फरक नाही.

१) पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका

२) अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक

३) ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी शाळेतील शिक्षक

४) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक

५) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक

### सारणी १

**माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान**

| व्यवसाय समाधान | पुरुष | स्त्री | अनुदानित | विना अनुदानित | ग्रामीण | शहरी | कायमस्वरुपी | तात्पुरते | पदव्युत्तर पदवीधर | पदवीधर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नमुना | २०२ | १४३ | २७४ | ७१ | १६९ | १७६ | २७० | ७५ | १०६ | २३९ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मध्यमान** | | ११६ण७३ | ११४ण४४ | ११७ण२८ | १०९ण९७ | ११६ण६१ | ११४ण९८ | ११७ण०४ | १११ण२५ | ११६ण७७ | ११५ण३४ |
| **प्रमाण विचलन** | | ११ण९५ | १२ण५६ | १२ण३६ | ९ण८९ | १२ण८६ | ११ण६० | १२ण३० | १०ण६१ | ११ण७३ | १२ण४६ |
| स्वाधीनता मात्रा | | ३४३ | | ३४३ | | ३४३ | | ३४३ | | ३४३ | |
| **सार्थकता स्तर** | ०ण०५ | १ण९७ | | १ण९७ | | १ण९७ | | १ण९७ | | १ण९७ | |
| | ०ण०१ | २ण५९ | | २ण५९ | | २ण५९ | | २ण५९ | | २ण५९ | |
| **टी' परीक्षिकेचे गुणोत्तर** | | १ण७० | | ५ण२५ | | १ण२३ | | ४ण०३ | | १ण०२ | |
| **सार्थकता स्तर** | | **लक्षणीय नाही** | | ०ण०१ | | **लक्षणीय नाही** | | ०ण०१ | | **लक्षणीय नाही** | |

या शून्य परिकल्पनेच्या परीक्षणासाठी 'टी' परीक्षिका तंत्राचा वापर करण्यात आला. व्यवसाय समाधान या चलासंदर्भात माध्यमिक शालेय शिक्षकांच्या पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका, अनुदानित शाळेतील व विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, ग्रामीण शाळेतील शिक्षक व शहरी शाळेतील शिक्षक, कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक व तात्पुरते नियुक्त शिक्षक आणि पदव्युत्तर पदवीधर शिक्षक व पदवीधर शिक्षक गटांच्या तुलनेतील प्राप्त 'टी' मूल्ये अनुक्रमे १.७०, ५.२५, १.२३, ४.०३ आणि १.०२ अशी आहेत. अनुदानित शाळेतील शिक्षक व विना अनुदानित शाळेतील शिक्षक, कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक या गटाचे प्राप्त 'टी' मूल्ये हे ०.०१ या स्तरावर लक्षणीय आहे व पुरूष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका, ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी शाळेतील शिक्षक आणि पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक या गटांचे प्राप्त 'टी' मूल्ये ह ०.०५ स्तरावर लक्षणीय नाही.

म्हणून माध्यमिक शालेय शिक्षकाच्या व्यवसाय समाधानात पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका, ग्रामीण शाळेतील शिक्षक व शहरी शाळेतील शिक्षक आणि पदव्युत्तर पदवीधर शिक्षक व पदवीधर शिक्षक या गटांमध्ये लक्षणीय फरक नाही. ही शून्य परिकल्पना स्वीकार्य आहे.

माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधानात अनुदानित शाळेतील शिक्षक व विना अनुदानित शाळेतील शिक्षक आणि कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक व तात्पुरते नियुक्त शिक्षक या गटांमध्ये लक्षणिय फरक नाही. ही शून्य परिकल्पना स्वीकार्य नाही.

म्हणजे व्यवसाय समाधाना सदर्भात अनुदानित शाळेतील शिक्षक व विना अनुदानित शाळेतील शिक्षक या गटांची तुलना करता अनुदानित गटाचे मध्यमान प्राप्तांक उच्च आहेत व

व्यवसाय समाधानासंदर्भात कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक व तात्पुरते नियुक्त शिक्षक या गटांची तुलना करता कायमस्वरूपी गटाचे मध्यमान प्राप्तांक उच्च आहेत.

२ माध्यमिक शालेय शिक्षकांच्या संघटनात्मक नागरिकत्व वर्तनात खालील गटामध्ये लक्षणीय फरक नाही.

१) पुरुष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका

२) अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षक

३) ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी शाळेतील शिक्षक

४) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक

५) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक आणि पदवीधर शिक्षक

## सारणी २

## माध्यमिक शालेय शिक्षकांच्या संघटनात्मक नागरिकत्व वर्तन

| संघटनात्मक नागरिकत्व वर्तन | पुरुष | स्त्री | टनुदानित | विना अनुदानित | ग्रामीण | शहरी | कायमस्वरुपी | तात्पुरते | पदव्युत्तर पदवीधर | पदवीधर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नमुना | 202 | 143 | 274 | 71 | 169 | 176 | 270 | 75 | 106 | 239 |
| मध्यमान | 152.83 | 151 | 155.10 | 140.55 | 153.25 | 151.01 | 154.99 | 141.75 | 153.10 | 151.67 |
| प्रमाण विचलन | 20.17 | 17.21 | 19.28 | 12.34 | 19.19 | 18.80 | 19.41 | 13.02 | 18.16 | 19.37 |
| स्वाधीनता मात्रा | 343 | | 343 | | 343 | | 343 | | 343 | |
| सार्थकता स्तर १ण९७ | 1.97 | | 1.97 | | 1.97 | | 1.97 | | 1.97 | |
| सार्थकता स्तर २ण५९ | 2.59 | | 2.59 | | 2.59 | | 2.59 | | 2.59 | |
| टी’ परीक्षिकेचे गुणोत्तर | 0.905 | | 7.67 | | 1.095 | | 6.93 | | 0.661 | |
| सार्थकता स्तर | लक्षणीय नाही | | ०ण०१ | | लक्षणीय नाही | | ०ण०१ | | लक्षणीय नाही | |

या शून्य परिकल्पनेच्या परीक्षणासाठी ‘टी’ परीक्षिका तंत्राचा वापर करण्यात आला. संघटनात्मक नागरिकत्व वर्तन या चलासंदर्भात माध्यमिक शालेय शिक्षकांच्या पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका, अनुदानित शाळेतील व विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, ग्रामीण शाळेतील शिक्षक व शहरी शाळेतील शिक्षक, कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक व तात्पुरते नियुक्त शिक्षक आणि पदव्युत्तर पदवीधर शिक्षक व पदवीधर शिक्षक गटांच्या तुलनेतील प्राप्त ‘टी’ मूल्ये अनुक्रमे ०.९१, ७.६७, १.१०, ६.९२ आणि ०.६६ अशी आहेत. अनुदानित शाळेतील शिक्षक व विना अनुदानित शाळेतील शिक्षक, कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक आणि तात्पुरते नियुक्त शिक्षक या गटांचे प्राप्त

'टी' मूल्ये हे ०.०१ या स्तरावर लक्षणीय आहे व पुरूष शिक्षक आणि स्त्री शिक्षिका, ग्रामीण शाळेतील शिक्षक आणि शहरी शाळेतील शिक्षक आणि पदव्युत्तर पदवीधर शिक्षक व पदवीधर शिक्षक या गटांचे प्राप्त 'टी' मूल्ये ह ०.०५ स्तरार लक्षणीय नाही.

म्हणून माध्यमिक शालेय शिक्षकाच्या संघटनात्मक नागरिकत्व वर्तन पुरूष शिक्षक व स्त्री शिक्षिका, ग्रामीण शाळेतील शिक्षक व शहरी शाळेतील शिक्षक आणि पदव्युत्तर पदवीधर शिक्षक व पदवीधर शिक्षक या गटांमध्ये लक्षणीय फरक नाही. ही शून्य परिकल्पना स्वीकार्य आहे.

माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसायिक बांधिलकीत अनुदानित शाळेतील शिक्षक व विना अनुदानित शाळेतील शिक्षक आणि कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक व तात्पुरते नियुक्त शिक्षक या गटांमध्ये लक्षणिय फरक नाही. ही शून्य परिकल्पना स्वीकार्य नाही.

म्हणजे संघटनात्मक नागरिकत्व वर्तनासंदर्भात अनुदानित शाळेतील शिक्षक व विना अनुदानित शाळेतील शिक्षक या गटांची तुलना करता अनुदानित गटाचे मध्यमान प्राप्तांक उच्च आहेत व संघटनात्मक नागरिकत्व वर्तनासंदर्भात कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक व तात्पुरते नियुक्त शिक्षक या गटांची तुलना करता कायमस्वरूपी गटाचे मध्यमान प्राप्तांक उच्च आहेत.

३ माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरिकत्व वर्तन यात खालील गटामध्ये लक्षणीय सहसंबंध नाही.

१) पुरुष शिक्षक २) स्त्री शिक्षिका

३) अनुदानित शाळेतील शिक्षक ४) विना अनुदानित शाळेतील शिक्षक

५) ग्रामीण शाळेतील शिक्षक ६) शहरी भागातील शिक्षक

७) कायमस्वरुपी नियुक्त शिक्षक ८) तात्पुरते नियुक्त शिक्षक

९) पदव्युत्तर पदवीधर शिक्षक १०) पदवीधर शिक्षक

११) एकुण शिक्षक

**सारणी ३**

**माध्यमिक शालेय शिक्षकांच्या व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरिकत्व वर्तन यात खालील गटामध्ये लक्षणीय सहसंबंध नाही**

| व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरिकत्व वर्तन | | पुरुष | स्त्री | अनुदानित | विना अनुदानित | ग्रामीण | शहरी | कायमस्वरुपी | तात्पुरते | पदव्युत्तर पदवीधर | पदवीधर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नमुना | | 202 | 143 | 274 | 71 | 169 | 176 | 270 | 75 | 106 | 239 | 345 |
| स्वाधीनता मात्रा | | 200 | 141 | 272 | 69 | 167 | 174 | 268 | 73 | 104 | 237 | 343 |
| कोष्ट कीय 'त' | ०.०५ | 0.138 | 0.164 | 0.12 | 0.234 | 0.152 | 0.149 | 0.121 | 0.227 | 0.192 | 0.129 | 0.107 |
| | ०.०१ | 0.181 | 0.215 | 0.157 | 0.304 | 0.199 | 0.195 | 0.159 | 0.296 | 0.250 | 0.169 | 0.139 |
| सहसंबंध गुणक | | 0.30 | 0.35 | 0.26 | 0.30 | 0.39 | 0.24 | 0.28 | 0.32 | 0.23 | 0.35 | 0.32 |
| सार्थकता स्तर | | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 |

या शून्य परिकल्पनेच्या परीक्षणासाठी पिअरसन परिघात परिगुणन पद्धतीचा उपयोग केला आहे.

**अर्थनिर्वचन :**

माध्यमिक शालेय पुरूष शिक्षक, स्त्री शिक्षिका, अनुदानित शाळेतील शिक्षक, विना अनुदानित शिक्षक, ग्रामीण शाळेतील शिक्षक, शहरी शाळेतील शिक्षक, कायम स्वरूपी नियुक्त शिक्षक, तात्पुरते नियुक्त शिक्षक, पदव्युत्तर पदवीधर शिक्षक, पदवीधर शिक्षक आणि एकुण शिक्षकांचे व्यवसाय समाधान आणि संघटनात्मक नागरीकत्व वर्तन यामधील सहसंबध अभ्यासताना प्राप्त 'त' मूल्ये अनुक्रमे ०.३०, ०.३५, ०.२६, ०.३०, ०.३९, ०.२४, ०.२८, ०.३२, ०.२२ व ०.३५ आणि ०.३२ अशी आहेत. प्राप्त 'त' ची किंमत सारणी 'त' च्या किंमतीपेक्षा जास्त आहे. म्हणून या शून्य परिकल्पनेचा ०.०१ स्तरावर त्याग करण्यात आला.

**निष्कर्ष**

हा सहसंबंध ०.०१ स्तरावर लक्षणीय असून तो धन स्वरूपाचा आहे. म्हणजे ज्या शिक्षकांची संघटनात्मक नागरीकत्व वर्तन जास्त असेल त्या शिक्षकांचे व्यवसाय समाधान जास्त असेल.

माध्यमिक शालेय शिक्षकांमधील पुरूष शिक्षक, स्त्री शिक्षिका, अनुदानित शाळेतील शिक्षक, विना अनुदानित शाळेतील शिक्षक, ग्रामीण शाळेतील शिक्षक, शहरी शाळेतील शिक्षक, कायमस्वरूपी नियुक्त शिक्षक, तात्पुरते नियुक्त शिक्षक, पदव्युत्तर पदवीधर शिक्षक, पदवीधर शिक्षक आणि एकुण शिक्षकांचे व्यवसाय समाधान व संघटनात्मक नागरीकत्व वर्तन यामधील सहसंबंध धन स्वरूपाचा असून फारच कमी प्रतीचा आहे.

## संदर्भ ग्रंथ यादी

**पुस्तके**

भिंताडे, वि. रा (१९९९). शैक्षणिक संशोधन पध्दती (द्वितीयावृत्ती). पुणे : नूतन प्रकाशन.

मुळे, रा.व. उमाठे, वि.(१९९८). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे (तृतीयावृत्ती). औरंगाबाद : विद्या बुक्स्.

पंडित ब. बि. (१९८९). शिक्षणातील संशोधन अभिकल्प (प्रथमावृत्ती). पुणे :नूतन प्रकाशन.

पाटील वा. भा (१९९९). संशोधन पध्दती, नागपूर : मंगेश प्रकाशन.

मस्के टी. ए. (१९८८). शैक्षणिक संख्याशास्त्र (प्रथमावृत्ती). पुणे : प्रज्ञा प्रकाशन.

कदम चा. प. (१९८९). शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नूतन प्रकाशन.

Best, J. and Kahn, J. W. ¼2003½- Research in Education (7th Ed.). New Delhi : Prentice- Hall of India Pvt. Ltd.

Buch, M. B. ¼1991½- Fourth Survey of Research in Education. Vol. 1. New Delhi : NCERT.

Buch, M. B. ¼1992½- Fifth Survey of Research in Education. Vol. 2. Baroda : M. S.University.

Garrett, H. E. ¼1985½- Statistics in Psychology and Education (11th Ed.). Vakil, Feffer and Simsons Ltd.

Kothari, C. R. (1985). Research Methodology-methods and techniques. New Delhi : Wiley Easter Ltd.

**ज्ञानकोश व शब्दकोश**

Guthrie, J. W. Encyclopedia of Education (2nd Ed.). P.C.M.

MacMillan.(1930) The Encyclopedia of Social Sciences (Vol. IX).

सोहोनी, शं. कृ. (१९९३). शैक्षणिक टीपाकोश (प्रथमावृत्ती). पुणे : सुधा सोहोनी.

Good, C. V. Dictionary of Education (2nd Ed.). New York : Mac Graw Hill.

Oxford. (1952). The Advanced Learner's Dictionary of Current English.

AMIERJ Peer-Reviewed Journal